# <u>जाहीरात</u>

पोलीस आयुक्त नागपुर शहर यांच्या आस्थापनेवरील विधी अधिकारी, गट अ, ब, व विधी अधिकारी हे पद 11 महिण्याकरीता कंत्राटी पध्दतीने भरावयाचे आहे, सदर पदाकरीता मासीक देय रक्कम, प्रवास खर्चाकरीता खालीलप्रमाणे देय राहील.

| अनु. क्र. | विधी अधिकारी गट | मंजुर पदे | एकत्रित अनुज्ञेय मासीक वेतन + दुरध्वनी व प्रवास खर्च |
|---|---|---|---|
| 1 | विधी अधिकारी गट अ | 1 | 20,000 + 5,000 |
| 2 | विधी अधिकारी गट ब | 3 | 15,000 + 5,000 |
| 3 | विधी अधिकारी | 4 | 12,000 + 3,000 |
| | एकुण पदे | 8 | |

**मा. मुबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या याचीका क्र. 9145/2010 व 99160/2010 मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णया विरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असलेल्या विशेश हक्क याचिका क्र. 19008–19009 महाराश्ट्र शासन व इतर विरुध्द अनिता आणि इतर व विशेष हक्क याचिका क्र. 20182/12 श्री. नारायण तुकारामपंत जाशी आणि इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर मध्ये दिनांक 2.11.2002 रोजी निर्गमित केलेले अंतरीम आदशाच्या अनुषंगाने अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन असतील.**

वरील पदे भरण्यासाठी सेवा, सेवाकरारातील मासीक देय रक्कम, सेवा करार कालावधी, वयोमर्यादा, अनुभव, शैक्षणीक अर्हता, अटी व शर्ती, कर्तव्य व जाबादा–या, अर्जाचा विहीत नमुना www.nagpurpolice.info या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.इच्छुक व पात्र उमेदवारांनी त्याचे पूर्ण भरलेले अर्ज आवश्यक कागदपत्रासह दिनांक 08/03/2016 चे 17.30 वा. पर्यंत पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर लेडीज क्लब जवळ सिव्हील लाईन, नागपूर येथे सादर करावे. लिफाफ्यावर पदाचा स्पष्ट उल्लेख करावा.

सही/–

(राजवर्धन) भापोसे
सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर

## DETAILS OF ADVERTISEMENT

APPLICATIONS in precscribed Proforma are invited from the Indian citizens Domiciled in Maharastra for the post of Legal Advisor in the office of the Commissioner of Police, Nagpur City Police on contract basis of 11 month extendable for two more turns. Contract pay & travelling expences per month for Legal Advisor are shown as below:

| Sr. No | Post | Vacancy | Contract pay & Travelling |
|---|---|---|---|
| 1 | Legal officer Group-A | 1 | 20,000+5,000/- |
| 2 | Legal officer Group-B | 3 | 15,000+5,000/ |
| 3 | Legal officer | 4 | 12,000+3,000/ |

**The appointment of above mentioned posts will be subject to the final decision of Special leave to Appeal ( Civil) 19008-19009/2012 pending in the Hon'ble Supreme Court of India**.

The detail of the service, Contract Pay, Period of the Contract, Age limit, Experience, Educational Qualification, Terms & Condition, Duties and Responsibilities and Pro-forma of the applications are published on the web site www.nagpurpolice.info . interested candidates are requested to visit the web site & send their application forms complete in all respects to Commissioner of Police office, Nagpur, ladies club, Civil line Nagpur- 440001 on or before 08/03/2016 at. 17-30 hrs. Superscribing the envelop as "Legal Advisor".

Sd/-

(Rajwardhan)IPS
Jt. Commissioner of Police
Nagpur City Police

# पोलीस आयुक्त, नागपूर शहर येथील विधी अधिकारी गट अ, ब व विधी अधिकारी यांची रिक्त पदे पुर्णतः कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत

सदर्भ :— मा. पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचे आदेश क्रं. पोमसं/2अ/3228/विअ/2012—13, दिनांक 15.02.2016.

पोलीस आयुक्त नागपूर शहर कार्यालयाच्या आस्थापनेवर विधी अधिकारी गट अ (01 पदे) ब (03 पदे) व विधी अधिकारी (04 पदे) एकुण 8 रिक्त पदे भरण्याकरीता खालील अटी व पात्रता पुर्ण असलेल्या उमेदवाराकडुन 11 महिन्यासाठी पुर्णतः कंत्राटी पध्दतीने नियुक्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

•सुचना — या बाबतचे अर्ज पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर प्रबंधक शाखा यांचेकडे दिनांक 08/03/2016 च्या कार्यालयीन वेळ (संध्याकाळी 05.45 मिनिट) पर्यंत सादर करावेत. उमेदवाराने सोबत दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज पुर्णपणे भरुन लिफाफ्यात घालुन लिफाफ्यावर उजव्या बाजुला ठळक अक्षरात विधी अधिकारी पदे व विधी अधिकारी या पदासाठी अर्ज नमुद करुन दिनांक 08/03/2016 पर्यंत पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर लेडीज कल्ब जवळ सिव्हील लाईन, नागपूर या पत्यावर पोहचेल यांची दक्षता घ्यावी. दिनांक 08/03/2016 नंतर या कार्यालयास प्राप्त झाालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. अर्जा सोबत पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे अर्जासोबत जोडावेत. अर्जाचा नमुना www.nagpurpolice.info या वेबसाईड वरील latest news या tab वरुन डाउनलोड करता येईल.

**अटी व शर्ती** :—

1) सदरची पदाची नेमणुक ही पुर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल उमेदवाराला शासकीय अधिकारी / कर्मचारी म्हणुन समजले जाणार नाही.

2) सदर नेमणुका या करार नियुक्ती पध्दतीने प्रथमतः 11 महीन्यासाठी करण्यात येतील, 11 महीन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी (जास्तीत जास्त 3 वेळा 11 महीन्याकरीता) वाढविता येईल. 3 वेळा मुदतवाढ दिल्यानंतर अशा उमेदवाराची पुनश्चः नियुक्ती करणे आवश्यक आहे असे समक्ष प्रधिकाऱ्यांचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्चः निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

3) निवड केलेल्या उमेदवार 11 महीन्याच्या कालावधीत वकिली व्यवसायाशी संबंधीत कोणत्याही प्रकारचे खाजगी काम/व्यवसास नियुक्ती प्रधिकाऱ्याच्या लेखी परवानगी शिवाय करु शकणार नाही. जर खाजगी व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

4) उमेदवाराची निवड लेखी परीक्षा व मुलाखतीव्दारे करण्यात येईल त्यानंतर लेखी परीक्षेचा व मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर कळविण्यात येईल.

5) उमेदवारांना कोणताही प्रवास खर्च देय असणार नाही.

6) नियुक्त केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा (Agreement) भरणे अनिवार्य राहील.

7)करार पध्दतीने नेमणुक करण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना मंजुर वेतन आणि प्रवास खर्चा व्यतीरीक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

8) उमेदवारांनी खालील नमुद केलेली शैक्षणीक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी दिनांक 08/03/2016 पर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे.

9) अर्जासोबत 2.5 सें.मी.X 2.5 सें.मी. आकाराचे सध्याचे फोटो काढलेले दोन रंगीन फोटो जोडावेत.

10) सदरील विधी अधिकारी यांच्या नेमणुका हया मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या याचीका क्र. 9145/2010 व 99160/2010 मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असलेल्या विशेष हक्क याचिका क्र. 19008–19009 महाराष्ट्र शासन व इतर विरुध्द अनिता आणि इतर व विशेष हक्क याचिका क्र. 20182/12 श्री. नारायण तुकारामपंत जोशी आणि इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर मध्ये दिनांक 2.11.2002 रोजी निर्गमित केलेले अंतरीम आदेशाच्या अनुषंगाने अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन असतील.

लेखी परीक्षेचा अभ्यासक्रम खालील प्रमाणे

1) मा. उच्च न्यायालय, मा. म.प्र. न्यायालय समक्ष एखादया प्रकरणात दाखल करावयाचे परीच्छेदनिहाय अभिप्राय किंवा शपथपत्र (संक्षिप्त स्वरुपात).

2) सेवाविषयक आणि फौजदारी स्वरुपाचे प्रकरण त्याचप्रमाणे ला.प्र. विभागाच्या सापळा प्रकरण किंवा फौ. प्र.सं. 1975 मधील कलम 197 किंवा महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी अधिनियम, 1999 मध्ये मंजुी प्रकरणात अभियोग दाखल करण्याची परवानगी देण्यासाठी आवश्यक माहीती.

3) सेवाविषयक आणि फौजदारी प्रकरणात सध्याची न्यायीक स्थिती (Setteled position of law) काय आहे?

**करारातील मासीक देय रक्कमः**

| अनु. क्र. | विधी अधिकारी गट | मंजुर पदे | एकत्रित अनुज्ञेय मासीक वेतन + दुरध्वनी व प्रवास खर्च |
|---|---|---|---|
| 1 | विधी अधिकारी गट अ | 1 | 20,000 + 5,000 |
| 2 | विधी अधिकारी गट ब | 3 | 15,000 + 5,000 |
| 3 | विधी अधिकारी | 4 | 12,000 + 3,000 |
| | एकुण पदे | 8 | |

**<u>शैक्षणीक अर्हता व वयोमर्यादा अनुभव :</u>**

**1) विधी अधिकारी गट अ**

**<u>शैक्षणीक अर्हता व अनुभव :–</u>**

1) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायद्याचा पदवीधर असेल. तो सनद धारक असेल.

2) विधी अधिकारी गट अ या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान 7 वर्षचा अनुभव आवश्यक राहील.

3) उमेदवार गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबतीत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडु शकेल.

4) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.

**<u>उमेदवाराचे वय</u>**

विधी अधिकारी गट अ या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी 45 वर्षा पेक्षा जास्त नसेल.

किंवा

जी व्यक्ती शासकीय सेवेत असतांना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी, प्रशासकीय व सेवाविषयक कायदेविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापीत समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागु राहतील. शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

**2) विधी अधिकारी गट ब**

**<u>शैक्षणीक अर्हता व अनुभव :–</u>**

1) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायद्याचा पदवीधर असेल. तो सनद धारक असेल.

2) विधी अधिकारी गट ब या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान 5 वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

3) उमेदवार गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबतीत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडु शकेल.

4) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.

**<u>उमेदवाराचे वय</u>**

विधी अधिकारी गट ब या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी 45 वर्षा पेक्षा जास्त नसेल.

किंवा

जी व्यक्ती शासकीय सेवेत असतांना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी, प्रशासकीय व सेवाविषयक कायद्यांविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापीत समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राह्य धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागु राहतील. शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

**3) विधी अधिकारी**

**<u>शैक्षणीक अर्हता व अनुभव :-</u>**

1) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायद्याचा पदवीधर असेल. तो सनद धारक असेल.
2) विधी अधिकारी गट ब या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान 5 वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.
3) उमेदवार गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबतीत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविशयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडु शकेल.
4) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.

**<u>उमेदवाराचे वय</u>**

विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी 45 वर्षा पेक्षा जास्त नसेल.

किंवा

जी व्यक्ती शासकीय सेवेत असतांना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी, प्रशासकीय व सेवाविषयक कायद्यांविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापीत समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागु राहतील.‘ शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

**<u>विधी अधिकारी गट अ, ब व विधी अधिकारी – कर्तव्य व जबाबदाऱ्या :</u>**

1. कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबीबाबत/न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.
2. सेवाविषयक/प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती यासोबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.
3. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञा पत्रे संबंधित अधिकाऱ्यांच्या मदतीने तयार करणे.
4. शपथ पत्राचा नमुना तयार करणे व त्यास समक्ष प्राधिकाऱ्यांची मान्यता घेऊन न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल ते पाहणे.

5. जेथे शासनाचे विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन त्याअ्नुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.
6. अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधीत सरकारी वकीलांकडे पाठविणे व अपीलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.
7. विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नमुद केलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.
8. पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.
9. वेळोवेळी देण्यात आलेले ईतर काम.

सही / —

(राजवर्धन) भापोसे.
सह.पोलीस आयुक्त,
नागपूर शहर

**अ) पोलीस आयुक्त, नागपूर शहर येथील विधी अधिकारी गट अ, ब व विधी अधिकारी यांची रिक्त पदे पुर्णतः कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत निवड प्रकीयेचा कार्यकम**

| अनु.कं. | विषय | दिनांक व स्थळ |
|---|---|---|
| 1 | अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | 08/03/2016 |
| 2 | लेखी परिक्षेचा दिनांक | 13/03/2016 |
| 3 | मुलाखतीचा दिनांक | 16 व 17/03/2016 |
| 4 | लेखी परिक्षेचे ठीकाण | आर.एस.मुंडले आर्ट्स ॲन्ड कॉमर्स कॉलेज, धरमपेठ, नागपुर |

सही/-

(राजवर्धन) भापोसे.
सह.पोलीस आयुक्त,
नागपूर शहर

## अर्जाचा नमुना

अ) विधी अधिकारी गट अ, ब/विधी अधिकारी पदाकरीता अर्ज

| | | |
|---|---|---|
| 1 | विधी अधिकारी | |
| 2 | विधी अधिकारी व विधी अधिकारी गट "ब" | |
| 3 | विधी अधिकारी व विधी अधिकारी गट "ब" व विधी अधिकारी गट "अ" | |

एका फोटोवर स्वाक्षरी करुन या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करुन अर्जासोबत लिफाफ्यात जोडावा

**(टिप – अर्जदारानी अर्ज भरतेवेळी लागु असलेल्या रकान्यात √ अशी खुण करावी.)**

**कार्यालयीन उपयोगासाठी**

१ अर्ज क्रमांक :

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

२. अर्ज स्विकारल्याचा दिनांक : / /

३. अर्ज स्विकारणाऱ्याची स्वाक्षरी दिनांकासह:–

सुचना :– अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत
अर्जदाराने माहीती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहीती फक्त इंग्रजीत लिहावी.
आवश्यक नसेल तेथे खोडावे.

अ) अर्जदाराची वैयक्तीक माहिती

1. अर्जदाराचे संपुर्ण नांव : आडनांव नांव वडीलांचे/पतीचे नांव
   मराठीत :– ..............................................................................................................................................

   इंग्रजीत :

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

2. पत्रव्यवहाराचा पत्ता : ..............................................................................................................

   तालुका : ......................................... जिल्हा : ......................................... पिन कोड :

3. कायमचा पत्ता : ..............................................................................................................

   तालुका : ......................................... जिल्हा : ......................................... पिन कोड :

4. दुरध्वनी क्रमांक– लॅडलाईन : ............................ मोबाईल क्रमांक : ..............................ई मेल : ..........................
............

5. जन्म दिनांक : .........................................          जन्मस्थळ : ...................................
दिवस  महिना  वर्षे

6. दिनांक ................................................रोजीचे वय : ....................................................
दिवस  महिना  वर्षे

7. लिंग : पुरुषः  महिला :

8. धर्म : ........................................................

9.

10. महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का? : होय  नाही

योग्य असेल त्या ठिकाणी ( ✔ ) अशी खुण करावी.

ब) अर्जदाराची शैक्षणीक माहिती :

11. शैक्षणीक अर्हता :

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नांव (विद्यालय / महाविद्यालय) | बोर्ड / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1) माध्यमीक शांलात प्रमाणपत्र परीक्षा (इ. 10वी) अथवा जुनी 11 वी परीक्षा | | | | | |
| 2) उच्च माध्यमिक शांलात प्रमाणपत्र परीक्षा (इ.12वी) | | | | | |
| 3) पदवी | | | | | |
| 4) विधी पदवी | | | | | |

12. इतर शैक्षणीक अर्हता :

संगणक प्रशिक्षित आहे काय? होय  नाही

13. अर्जदाराची इतर माहिती

अ) सनद घेतल्याचा दिनांक

ब) उमेदवाराने स्वतः हाताळलेल्या केसेसचा तपशिल

| अ.क्र. | न्यायालयाचे नांव | केसेसचा प्रकार | केसेसच्या संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |

**टिप** : वकीली व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| 13–अ अर्जदारांवर यापुर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात/स्थानबध्द करण्यात/बध्द करण्यात/सिध्दोषी ठरवण्यात आले आहे काय, किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही विद्यापीठाकडुन किंवा इतर कोणत्याही शैक्षणीक प्राधिकरणाकडुन/संस्थेकडुन कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय/काढुन टाकण्यात आले आहे काय? | होयः<br>नाहीः |
| 13–ब हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात/संस्थेत उमेदवाराविरुध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय? | होयः<br>नाहीः |

(13–अ किंवा 13–ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरतांना सदर खटला, अटक, स्थानबध्दता दंड, दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यादीचा संपुर्ण तपशिल आणि न्यायालय/विद्यापिठ/शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणाचे स्वरुप स्पष्ट करावे.)

ठिकाण : अर्जदाराची सही

दिनांक : (दिनांकासह)

# <u>अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र</u>

मी, श्री/सौ./कु. ............................................................ याव्दारे प्रतिज्ञापुर्वक असे जाहीर करतो/करते की, वरील माहीती जाणीपुर्वक तसेच विश्वासपुर्वक दिली असुन ती खरी आहे. जाहीरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक आर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमुद केलेली कोणतीही माहीती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळुन लावल्यास किंवा निवडीच्या टप्प्यावर माझी निवड/नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहीती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण : अर्जदाराची सही
दिनांक : (दिनांकासह)

सोबत : अर्जात नमुद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती

—————————————— 000 ——————————————

सही/—

(राजवर्धन) भापोसे
सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर

नागपूर

दिनांक :